क्रमांक २१९३(२)/२०१८/१४-ब दिनांक - ३०सप्टेंबर, २०१९

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा-२०१८ (जाहिरात क्रमांक ३६/२०१८)
## अंतिम निकालाची घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय (पदुम) विभागातील कृषि उपसंचालक, महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ, तालुका कृषि अधिकारी, महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब व कृषि अधिकारी, महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब (कनिष्ठ) या संवर्गासाठी एकुण ३९९ पदांकरिता दिनांक ०८ सप्टेंबर, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा -२०१८ च्या एकूण ३९९ पदांचा अंतिम निकाल दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये अहमदनगर जिल्हयातील श्री. शिंदे वैभव दत्तात्रय (बैठक क्रमांक PN००४१०१) हे राज्यातून प्रथम आले आहेत व सातारा जिल्हयातील श्री. शेंडे अजय आनंदा (बैठक क्रमांक PN००४४३५) हे मागास वर्गवारीतून राज्यातून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून सातारा जिल्हयातील श्रीमती चव्हाण प्रणाली सुधीर (बैठक क्रमांक PN००९१९०) हया राज्यातून प्रथम आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा -२०१८ दिनांक ०८ सप्टेंबर, २०१८ रोजी मुंबईसह औरंगाबाद, नागपूर व पुणे या जिल्हाकेंद्रावर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता ६९,८४८ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा -२०१८ परीक्षेकरिता ६१६० उमेदवार अर्हताप्राप्त ठरले होते. प्रस्तुत लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे ३९९ उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधिन राहुन जाहिर करण्यात आला आहे.

६. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट- ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज

सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व त्यासंदर्भातील उक्त दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहिल.

७. सदर शिफारस यादीत नमूद केलेल्या दिव्यांग वर्गवारीतील शिफारसपात्र उमेदवारांनी सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. अप्रकि-२०१२/प्र.क्र. २९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ नुसार SADM संगणक प्रणालीतील दिव्यांगत्वाची प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. सदर प्रमाणपत्रे वैदयकीय मंडळाकडून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून त्यांची शिफारस शासनाकडे करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक सा.प्र.वि. अपंग ११०३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ६ मे, २००४ मधील बाब क्र. (६) नुसार त्यांच्या नेमणुकीपूर्वी उमेदवार संबंधित पदावर नियूक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची देखील वैदयकीय मंडळाकडून तपासणी केल्यानंतर ते नेमणुकीस पात्र ठरतील.

८. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे Online पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना क्रमांक ३.८ पहावी.)

ठिकाण : मुंबई

उपसचिव (परीक्षा-१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग